# *महाराष्ट्र विधानसभा*

## *दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
## *बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट, २०१७*
## *(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : मा.अध्यक्ष यांचा प्रस्ताव -*

*(अ) "९ ऑगस्ट या क्रांती दिनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करणारा प्रस्ताव."*

*(ब) "माननीय श्री.रामनाथ कोविंद यांची भारताच्या राष्ट्रपती पदी तसेच माननीय श्री.व्यंकय्या नायडू यांची भारताच्या उप राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."*

*दोन : प्रश्नोत्तरे.*

*तीन : शोक प्रस्ताव -*

*श्री.रघुनाथ शंकर सातकर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

*चार : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -*

*(१) मुख्यमंत्री : नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*(२) वित्त व नियोजन मंत्री : (क) महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) मॅफको महामंडळाचा सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे चव्वेचाळीसावा व पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

(ग) *शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.*

*(३) उच्च व तंत्र शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री :*

*(क) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.*

*(४) ग्रामविकास मंत्री :*

*(क) सन २०१४-२०१५ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील चव्वेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) सन २०१५-१६ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा/ यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.*

| | | |
|---|---|---|
| (५) जलसंपदा मंत्री | : | कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१४-२०१५ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (६) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री | : | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (७) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | : | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

पाच : लोकलेखा समितीचा चोविसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

सहा : अनुसूचित जाती कल्याण समितीचा आठवा अहवाल सादर करणे.

सात : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्या श्रीमती दिपीका संजय चव्हाण यांनी श्री.सुनिल सौंदाणे, तहसिलदार, बागलाण, जि.नाशिक यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. राजेश क्षीरसागर यांनी श्रीमती ज्योतीप्रिया सिंह, तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर व विद्यमान पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा २, पुणे शहर, पुणे आणि श्रीमती वैशाली माने, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, कोल्हापूर व विद्यमान सहायक पोलीस आयुक्त, पुणे यांच्याविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या

*शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.*

*आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*नऊ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)*

*(१) ॲड. आशिष शेलार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. संजय केळकर, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अस्लम शेख, अमर काळे, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अमीन पटेल, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, हर्षवर्धन सपकाळ, अब्दुल सत्तार, शरद सोनावणे, अशोक पाटील ,श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, चंद्रकांत सोनवणे, सरदार तारासिंह, सुनिल प्रभू, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"परभणी जिल्ह्यातील आंध्रा बँक, युको बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सिंडीकेट बँक या पाच राष्ट्रीयकृत बँका व रत्नाकर बँक या खाजगी बँकेच्या अधिका-यांशी संगनमत करून गंगाखेड शुगर ॲण्ड एनर्जी लि. कारखान्याच्या संचालक मंडळाने हजारो शेतक-यांच्या नावावर तब्बल ३२८ कोटींचे कर्ज उचललेले असल्याचे माहे जुलै २०१७ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे या शेतक-यांना दुस-या कोणत्याही बँकांचे कर्ज मिळत नसणे, तसेच सदर कर्ज देताना या कर्जदारांकडून रिझर्व बँकेच्या नियमानुसार केवायसीची पूर्तता केलेली नसून गंगाखेड शुगरने पुरवलेल्या कागदपत्रांच्या आधारेच कर्ज दिलेले असणे, या एकाही प्रकरणात २० टक्के मार्जिन मनी घेतली गेलेली नसून कर्जदारांनी कोणत्याही प्रकारचा कर्ज मागणी अर्ज दिलेला नसणे, तसेच कर्ज दिल्यावर ते आधी खातेदार शेतक-यांच्या बचत खात्यात जमा करून त्यानंतर खातेदारांची परवानगी न घेता गंगाखेड शुगरच्या खात्यात वळते करणे, त्यामुळे अशाप्रकारे परभणी जिल्ह्यातील हजारो शेतक-यांची बनावट कागदपत्रे सादर करून त्यांची फसवणूक करणाऱ्या गंगाखेड शुगर व एनर्जी लि. या कारखानाच्या संचालकांवर तसेच संबंधित बँकांच्या अधिका-यांवर फौजदारी कारवाई करून फसवणूक झालेल्या शेतक-यांना*

*न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २)*

*(२) सर्वश्री. संजय सावकारे, उदेसिंग पाडवी, पास्कल धनारे, किशोर पाटील, डॉ. सतीश पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील विशेषत: जळगांव जिल्हयातील साकरी, खंडाळा, मोंढाळा, कुऱ्हेपाणाचे, गोजोरा, वांजोळा या गावातील जिल्हापरिषदेच्या शाळांना जिल्हा परिषद व ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक ३० जून, २०१७ रोजी भेट देऊन पोषण आहाराबाबत केलेली चौकशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदस्यांसमवेत धरणगाव, भुसावळ, चोपडा तालुक्यातील दहा शाळा व ठेकेदाराच्या गोदामामधील मालाचीही केलेली तपासणी, जिल्हा परिषदेच्या शाळामध्ये देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारातील धान्याच्या मालाचे दर व बाजारातील दर यात मोठया प्रमाणात तफावत असल्याचे निदर्शनास येणे, शालेय पोषण आहारामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने पुरवठादाराला मुदतवाढ देऊ नये तसेच शाळास्तरावर मुख्याध्यापकांनी देयके सादर करावीत असे शासनाचे आदेश असतांना जिल्हा परिषदेने पुरवठादाराला नियमबाह्य दिलेली मुदतवाढ, सन २०१४-१५ मधील पोषण आहारामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी पुरवठादाराविरुध्द अद्यापही गुन्हा दाखल न होणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शालेय पोषण आहारातील गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ४)*

*(३) सर्वश्री.राजेश क्षीरसागर, प्रकाश आबिटकर, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री. चंद्रदीप नरके, सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"कोल्हापूर जिल्ह्यातील श्री अंबाबाईला घागरा-चोलीचा वेश परिधान करण्यात आल्यामुळे भाविक आणि श्रीपूजक यांच्यात निर्माण झालेला संघर्ष, श्री*

*अंबाबाई मंदिर पुजारी हटाव संघर्ष समितीने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पंढरपूर, शिर्डी, तुळजापूर येथील मंदिराप्रमाणे श्री अंबाबाई मंदिरातील हक्कदार पुजारी यांना काढून बहुजन समाजातील सुशिक्षित पुजा-यांची मुलाखत व लेखी परिक्षेद्वारे वेतनावर नियुक्ती करुन आणि विद्यमान पुजा-यांना १५ दिवसांत मंदिर प्रवेश बंद करावा अशी निवेदनाद्वारे केलेली मागणी, यासंदर्भात पंढरपूर देवस्थानच्या धर्तीवर करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात वेतनावर पुजारी नेमण्याबाबत जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने माहे जून, २०१७ मध्ये समिती स्थापन करुन तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, श्री अंबाबाई देवास्थांनामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार होत असतांनाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, व सिंधुदुर्ग जिल्हयातील देवस्थांनामध्ये कोटयवधी रकमेचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी सीआयडी मार्फत चौकशी करण्याचे शासनाने एक वर्षापूर्वी आश्वासन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी भाविकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(४) श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"मुंबई व मुंबई उपनगर क्षेत्रात चार ते पाच पिढयांपासून अनेक कुटुंबे पागडी तत्वावर (भाडे तत्वावर) राहत असणे, सदरची घरे साधारणपणे ६० ते ७० वर्षापूर्वीची असून सद्य:स्थितीत त्या घरांची झालेली दूरवस्था, तेथे राहत असलेल्या नागरिकांचा घरावर  मालकी हक्क नसल्याने व घरमालक दुरुस्तीसाठी परवानगी देत नसल्याने रहिवाशांना जीव मुठीत धरुन रहावे लागत असणे, भाडेकरुंना घर मालकी हक्क देण्याबाबत महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ (सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) मध्ये तरतूद नसल्याने शासनाने भाडेकरु देत असलेल्या भाडयाच्या १०० पट रक्कम शासन दरबारी जमा करुन कायदेशीररित्या त्यांना मालकी हक्क देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''*

*(दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ते ७)*

*(५) श्री. भाऊसाहेब कांबळे, ॲड· त्र्यंबक भिसे, सर्वश्री. अमित देशमुख, विनायकराव जाधव-पाटील, बसवराज पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"लातुर जिल्हयात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, मांजरा, रेणा, तेरणा, आदि नदयांना तसेच ओढे नाल्यांना आलेल्या*

*पुरामुळे शेतीचे व सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान, श्रीरामपूर (ता.राहुरी,जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्यांनी सन २०१६ च्या खरीप हंगामातील पिक विमा हप्ता भरलेला असताना अतिवृष्टीमुळे व इतर कारणांमुळे नुकसान झालेल्या पिकांचे कृषी व महसुल विभागामार्फत पंचनामे करुन नियमानुसार ४० दिवसांत शेतक-यांना प्रधानमंत्री राष्ट्रीय पिक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई देण्याची तरतूद असतांना कंपनीने अद्यापही नुकसान भरपाई न देणे, शेतक-यांचे १०० टक्के नुकसान ग्राहय धरुन सरसकट नुकसान भरपाई देण्याचे व ज्या शेतक-यांनी पिक विमा भरला नाही त्यांनाही पिक विमा रक्कमेत ५० टक्के रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याचे शासनाने आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, विमा कंपनीने ड्रोनद्वारे नियमबाहय पंचनामे करणे, NDRF अंतर्गत मदत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी महसुल व कृषी विभागाने केलेल्या पंचनाम्याच्या आधारे सन २०१६ च्या खरीप हंगामातील पिक विमा नुकसान भरपाई व नैसगिक आपत्ती अंतर्गत मदत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(६) कु.प्रणिती शिंदे, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"सोलापूर येथील शासकीय तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम हा टप्प्या-टप्प्याने बंद करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, शासकीय तंत्रनिकेतन बंद न करता त्याच ठिकाणी उपलब्ध असलेल्या ३२ एकर जागेत शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय सुरु करण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, या भागातील विदयार्थ्यावर शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अन्याय होत असल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासकीय तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम बंद होऊ नये यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(७) सर्वश्री. मनोहर भोईर, भास्कर जाधव, सुभाष पाटील, भरतशेठ गोगावले, सदानंद चव्हाण, राजन साळवी वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे खारभूमी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"उरण (जि.रायगड) येथील कोणी, केळवणे, खोपटा, कोप्रोली तसेच मोठी जुई येथील समुद्रकिना-यावर बांधण्यात आलेले बंधारे समुद्राला येणा-या उधाणामुळे कमकुवत होणे, समुद्राच्या मोठया भरतीच्या वेळी बंधारे फुटून खारे पाणी भातशेतीत शिरल्याने शेकडो हेक्टर जमिन नापिक होऊन खारे पाणी घरात शिरल्याने रहिवाश्यांना अन्यत्र राहण्यास जावे लागणे, यावर उपाय म्हणून खार जमीन विभागाने खोपटा ते कोप्रोली दरम्यान सात किमीच्या बंदिस्तीचे काम सुरु*

*करणे, परंतु कंत्राटदाराला शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्याने ते अपुर्णावस्थेत असणे, सदर बंधारे इतर आस्थापना स्वखर्चाने बांधण्यास तयार असून एमसीझेडएमए ची परवानगी न मिळाल्याने कामे अपूर्णावस्थेत असणे, समुद्र किनाऱ्यावरील भरती व लाटामुळे जमिनीची मोठया प्रमाणात धूप होऊन घरांची होत असलेली पडझड, याकरीता धुप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये ४९ कामांना मंजूरी देऊन ४२ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊनही पर्यावरण विभागाद्वारे किनारपट्टी नियमन क्षेत्राची मंजूरी न मिळाल्याने कार्यारंभ आदेश प्राप्त न होणे, कोकण भवन, रत्नागिरी व सिंधुदुर्ग पतन विभागांतर्गत मुंबई शहर व उपनगर, ठाणे, रायगड तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या संरक्षित करावयाच्या कामांना ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत प्रस्ताव देऊनही अद्याप मंजुरी न मिळणे, त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील मच्छिमार व नागरी वस्त्यांचे समुद्राच्या लाटांमुळे जिवित व वित्तहानी होण्याची निर्माण झालेली भिती, त्यामुळे मंजूर केलेल्या सर्व कामांना कार्यारंभ आदेश देवून धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(८) सर्वश्री. गणपतराव देशमुख, अनिल बाबर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व कोकण विभागामध्ये गत काही वर्षांमध्ये ३० ते ३२ हजार कोटी रूपये खर्च करून सिंचनासाठी अनेक उपसा जलसिंचन प्रकल्पाची केलेली उभारणी, प्रकल्पातील साठवलेल्या पाण्यावर वीज तयार करण्यासाठी तसेच प्रकल्पाच्या देखभालीच्या खर्चाची वसुली शेतकऱ्यांकडून करणे, परिणामी पाटाने पाणी देणाऱ्या पाणीपट्टीच्या दरापेक्षा उपसा जलसिंचन योजनेमधील शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी आकारण्यात येणारा दर कित्येक पटीने महाग असणे, सदर योजना दुष्काळी व उंचावरील भागात असल्यामुळे वीज पुरवठयाची रक्कम वीज वितरण मंडळाकडे न भरल्यामुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने पाटाने पाणी पुरवठा करणाऱ्या जलप्रकल्पाचे व उपसा जलसिंचन पद्धतीने पाणी पुरवठा करणाऱ्या जलप्रकल्पाचे दर एकत्रित करून दर आकारण्याचा निर्णय घेवून शासनाकडे गत वर्षी सादर करणे, तथापि, त्यावर अद्याप शासनामार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, राज्यातील जलसंपत्ती प्रकल्पाचे दर निश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(९) सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, जितेंद्र आव्हाड, सुनिल केदार, गोपालदास अग्रवाल, अब्दुल सत्तार, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, अस्लम शेख, अमर काळे,*

*वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"ठाणे शहरात रतनशी प्रेमजी चॅरिटी ट्रस्टच्या मालकीची हजारो एकर असलेली जमीन, सदर जमीनीमधील शेकडो एकर जमीन ट्रस्टने धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता विकासकांना विक्री केल्याची बाब माहे जुलै २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदरच्या जमीनीची एकाच दिवशी दोन वेळा विक्री तसेच ३६/ब व ७०/ब चे आदेश काढुन त्याची रजिस्टरला झालेली नोंद, सदरची विक्री महसूल अधिका-यांच्या संगनमताने झालेली असणे, विकासकांनी सदर जमीनीवर उभारलेल्या उंच इमारती, बनावट पावत्या देऊन नोंदणी करणे, २४ तासात फेरविक्री करुन त्यातून कोट्यवधी रुपयांचा अपहार होणे, या संपूर्ण व्यवहारात शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडणे, याकडे धर्मादाय आयुक्त, महसूल अधिकारी तसेच ठाणे महानगरपालिकेने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या प्रकरणी संबंधितांवर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(१०) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"महिला व बालविकास विभागाने टेक होम रेशनचे (THR) कंत्राट महिला बचत गटांऐवजी व्यंकटेश महिला औद्योगिक उत्पादन संस्था, महालक्ष्मी गृह सहकार, उद्योग व बालविकास सहकारी संस्था व महालक्ष्मी सहकारी गृह उद्योग लि. या तीन खाजगी संस्थांना दिल्याप्रकरणी त्याची चौकशी करण्याची सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश, केंद्र शासन व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार टेक होम रेशन (THR) ग्रामीण समुदाय आणि महिला बचत गट यांचेकडून घेण्याचे निर्देश असतांना एकात्मिक बालविकास सेवा (ICDS) च्या माध्यमातून ७७७ कोटी रुपयांच्या निविदेपैकी ८८ टक्के काम उपरोक्त तीन खाजगी संस्थांना दिल्याचे निदर्शनास येणे, वरील तीनही संस्थाचे पत्ते त्यांच्या पालक कॉर्पोरेट कंपन्यांचे असणे, त्याचप्रमाणे स्वाक्षरी करणाऱ्या अधिकृत व्यक्ती हे या तीनही कॉर्पोरेट कंपन्यांचे संचालक असणे, या तिन्ही खाजगी कॉर्पोरेट संस्था व त्यांच्या सहयोगी निलाक्षी महिला बचत गट, सिध्दकला महिला बचत गट, अमृत स्वयंसहाय्यता महिला बचत गट, मोरेश्वर महिला बचत गट, रेणूका महिला बचत गट, गौरी महिला बचत गट, महालक्ष्मी महिला विकास संस्था, सावलेश्वरी महिला बचत गट, साळवेश्वरी महिला बचत गट, महालक्ष्मी महिला विकास संस्था, हिंगोली, गौरी महिला बचत गट, हिंगोली, भक्ती महिला बचत गट, हिंगोली, या संस्थांनी टेक होम रेशन निविदा प्रक्रियेमध्ये कोटयवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार त्यामुळे त्यांची चौकशी करुन त्यांना देण्यात आलेले कंत्राट रद्द करुन नवीन*

*निविदा प्रक्रिया प्रसिध्द करण्याची आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, मुंबई यांचेकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(११) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, ॲड.यशोमती ठाकूर, श्री. अस्लम शेख, डॉ. संतोष टारफे, श्री. रवि राणा, डॉ. अनिल बोंडे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती वैद्यकीय महाविद्यालयाच्या (जि.अमरावती) रुग्णालयात चार नवजात बालकांचा झालेला मृत्यू, याप्रकरणी नेमण्यात आलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला यांच्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात चारही बालकांचा मृत्यू पोटॅशियम क्लोराईडच्या इंजेक्शनमुळे झाला असल्याची शक्यता व्यक्त करणे, जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांनी दिलेल्या अहवालात रुग्ण बालकांचा निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याप्रकरणी एक निवासी डॉक्टर व २ स्टाफ नर्स यांना अटक करण्यात येणे, मात्र या प्रकरणी प्रमुख जबाबदारी असणा-या पॅडीयाट्रिक्स विभागाचे प्रमुख व महाविद्यालयाचे अधिष्ठाता (डीन) यांचेविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे आपल्या गुन्ह्यासाठी निवासी डॉक्टरांचा बळी घेणा-यानां तातडीने अटक करून त्यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी होत असलेली मागणी, महाविद्यालय अधिष्ठाता (डीन) यांना स्वाक्षरीचे अधिकार नसतांना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यांच्या संगनमताने औषधी उपचाराची उपकरणे व इतर साहित्य अनधिकृतपणे खरेदी करीत असल्याबाबत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय ताब्यात घेऊन अनधिकृतपणे कामकाज करणारे अधिष्ठाता व शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा)*

*दहा : अल्पकालीन चर्चा :*

*सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मनिषा चौधरी, डॉ.भारती लव्हेकर, श्री.उन्मेश पाटील, प्रा.मेधा कुलकर्णी, श्री.अनिल गोटे, श्रीमती.मंदा म्हात्रे, श्री.संजय सावकारे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमा हिरे, श्री.सुधाकर भालेराव, प्रा.संगिता ठोंबरे, सर्वश्रीमती स्नेहलता कोल्हे,*

*माधुरी मिसाळ, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)*

*"लातूर शहरात ११ वर्षीय मुलीचे तिच्या आई-वडीलांच्या अपरोक्ष सांगली जिल्हयात लग्न लावून दिल्याप्रकरणी लातूर, एमआयडीसी पोलीस स्थानकात एका महिलेने दिनांक १ जुलै, २०१७ रोजी दाखल केलेला प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.), दहा व्यक्तींच्या टोळीने बनावट वधु-वर सुचक केंद्र स्थापन करुन अल्पवयीन मुलींचे वयोवृध्द पुरुषांबरोबर विवाह लावून देणे, त्यांच्या फोटोंचा गैरवापर करणे, ही टोळी अल्पवयीन मुलींचा मानसिक व लैंगिक छळ करून त्यांना आर्थिक आमिष दाखवून परराज्यात तसेच देशाबाहेर देखील विक्री करत असल्याचे निदर्शनास येणे, सदर टोळीने ३०० अल्पवयीन मुलींची केलेली तस्करी, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची व अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने राज्यातील महिलांना संरक्षण देऊन त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*अकरा : शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७.*

-----------------------------------------------------------------------------------
-------

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.*

-----------------------------------------------------------------------------

*(२) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

-----------------------------------------------------------------------------------------------

*(३) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---------------------------------------------------------------------------------
-------

*(४) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---------------------------------------------------------------------------------

*बारा : सभागृह नेते यांचा प्रस्ताव —*

*"भारताच्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलचा प्रस्ताव."*

*( मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.)*

*तेरा : सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री हसन*

*मुश्रीफ, सुनिल केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, मो.आरिफ नसीम खान, सुरेश लाड, अमित देशमुख, दिलीप सोपल, डि.एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी.पी.सावंत, कालिदास कोळंबकर, शिवेंद्रसिंह भोसले, बसवराज पाटील, राजेश टोपे, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, के.सी.पाडवी, कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री.हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री शेख असिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, पंकज भुजबळ, प्रदिप जाधव-नाईक, दिपक चव्हाण, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :*

*"राज्यात मंत्रालयीन विभागामध्ये १२०० योजना कार्यरत असणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने आर्थिक काटकसरीच्या नावाखाली व निती आयोगाने दोन वर्षापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने राज्याला दिल्या जाणाऱ्या १०० टक्के अनुदानाच्या ६६ योजना कमी करुन त्या २८ वर आणणे, यावर्षी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, गृह, उर्जा, कामगार, नगरविकास इत्यादी विभागाच्या ७६ योजना वगळण्यात येणे, राज्याच्या नियोजन विभागाने काही योजना बंद अथवा काही योजनांचे एकत्रिकरण करून त्याची यादी तयार करणे, कृषी आणि उर्जा विभागाने योजना बंद करण्यात घेतलेला पुढाकार, राज्यातील शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी व शासकीय कर्मचाऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी या पार्श्वभूमीवर राज्याच्या महसुलात घट होणार असल्याने शासकीय खर्चात ३० टक्के कपात करुन शासनाने एकप्रकारे काटकसरीची आणीबाणी जाहीर केल्याने राज्याच्या विकास कामांना/योजनांना बसलेली खीळ, अर्थसंकल्पात केलेली विकासनिधीची ५० टक्के रक्कमदेखील मार्चअखेर खर्च न झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी राज्य प्रगतीपथावर जाण्याऐवजी अधोगतीकडे वाटचाल करीत असल्याची निर्माण झालेली भिती, विविध विभागाच्या योजना बंद करण्याचा शासनाने लावलेला सपाटा, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेला असंतोष, शासनाने याप्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*( मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.)*

चौदा : *ॲड आशिष शेलार, सर्वश्री सुनिल प्रभु, अतुल भातखळकर, डॉ.अनिल बोंडे, श्री.राम कदम, डॉ.शशिकांत खेडेकर, श्री.किसन कथोरे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री संतोष दानवे, राज पुरोहित, किशोर पाटील, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री अनिल कदम, विजय काळे, हेमंत पाटील, सुरेश हाळवणकर, नारायण पाटील, अमित साटम, शिवाजीराव नाईक, उन्मेश पाटील, प्रशांत बंब, डॉ.राहुल पाटील, डॉ.आशिष देशमुख, श्री.अजय चौधरी, डॉ.सुनिल देशमुख, सर्वश्री शंभुराज देसाई, सुधाकर देशमुख, राजेश क्षीरसागर, नरेंद्र पवार, सुधाकर कोहळे, अमल महाडीक, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री अतुल सावे, रणधीर सावरकर, बाबुराव पाचर्णे, चंद्रदीप नरके, सदानंद चव्हाण, अशोक पाटील, वि.स.स. यांचा २९३ अन्वये प्रस्ताव :*

*''राज्यात मराठा समाजाची अनेक वर्षांपासून आरक्षणाची मागणी असणे, राणे समितीच्या शिफारशींना अनुसरुन मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, परंतु त्या निर्णयाला मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने मा.न्यायालयाकडून मराठा आरक्षणाच्या निर्णयास स्थगिती मिळणे, ही स्थगिती उठविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरु असणे, गेल्या दोन दशकात शेतीची झालेली दूरवस्था, त्यामुळे केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील मराठा समाजाची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत जाणे, परिणामी त्यांच्या मुलांची शैक्षणिक प्रगती न होणे, त्यामुळे इतर समाज गटांच्या तुलनेत आपण मागे पडतो याची खंत मराठा समाजाला अस्वस्थ करित असणे, त्याचे पडसाद राज्यातील जिल्हया-जिल्हयातून निघणा-या मराठा समाजाच्या विराट मोर्चातून प्रतिबिबिंत होणे, राज्य शासनाकडून त्याची त्वरीत दखल घेण्यात येऊन राज्यातील तरुणांना शैक्षणिक व स्वयंरोजगार क्षेत्रात स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासाचे शिक्षण देण्याकरिता ''स्कील इंडिया'' योजना राबविण्यात येणे, आदिवासी भागातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्य पुरविण्याकरिता "पंडित दीनदयाल उपाध्याय आदिवासी विकास योजना" राबविण्यात येणे, शासनाकडून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शैक्षणिक शुल्कातील सवलत ६ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याकरिता "राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजना" राबविण्यात येणे, मागास आयोगाची निर्मिती करण्यात येणे, डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह वेतन योजना राबविण्यात येणे, वसतीगृहात राहणा-या मुलांना सुविधा पुरविण्याकरिता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची निर्मिती करुन या मंडळाकरिता भरघोस आर्थिक तरतुद करण्यात येणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळण्याकरिता केंद्र शासनाची "सारथी योजना" राज्यात राबविण्यात येणे, या व इतर अनेक माध्यमातून राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक शैक्षणिकदृष्टया प्रगत होईल व त्याला कौशल्य विकासावर आधारित स्वयंरोजगार मिळून तो स्वावलंबी होऊ शकेल अशी शासनाची भूमिका असणे,*

*याखेरीज मराठा समाजाकडून सातत्याने मराठा आरक्षणाची मागणी होत असल्याने हा विषय शासनाने मागासवर्ग आयोगाकडे सोपविला असणे, मागासवर्ग आयोगाने या विषयाचा सखोल अभ्यास करुन लवकरात लवकर अहवाल देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''*

| | |
|---|---|
| *विधान भवन,* | *डॉ. अनंत कळसे,* |
| *मुंबई,* | *प्रधान सचिव,* |
| *दिनांक : ८ ऑगस्ट, २०१७.* | *महाराष्ट्र विधानसभा.* |